# प्रकल्पाची संक्षिप्त माहिति

**मे. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लि.,**

**कुंडल, तालुका पलूस, जिल्हा सांगली, महाराष्ट्र**

**यांच्या**

**मद्यार्क आसवनी प्रकल्पाची स्थापना**

# प्रकल्पाची संक्षिप्त माहिती

(भारत सरकारच्या पर्यावरण विभागाने आखून दिलेल्या चौकटीनुसार)

**१. प्रकल्पाचे नाव व स्थान**

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लि.,
कुंडल, तालुका पलूस, जिल्हा सांगली, महाराष्ट्र

**२. उत्पादन क्षमता**

| # | उत्पादन विभाग | क्र. | एकक | क्षमता | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सध्याची | अधिक | एकूण |
| १ | आसवनी | 5(g) | कि. ली. प्रतिदिन | | ६० | ६० |
| २ | साखर | 5(j) | टन प्रतिदिन | ५००० | - | ५००० |
| ३ | सह विद्युत | 1(d) | मेगावॉट | १९.७ | - | १९.७ |

साखर व सहविद्युत निर्मितीचे विस्तारीकरण नाही.

**३. आवश्यक साधनसामुग्री**

- जमीन: कारखान्याजवळ स्वतःची ५०.५९ हे. जमीन आहे. प्रस्तावित प्रकल्प यात सामावून जाईल.
- पाणी: पाण्याची दैनंदिन आवश्यकता २८० घ. मी. आहे. हे गरज पाण्याच्या पुनर्वापराने कमी होईल. सिंचन विभागाने दिलेल्या परवानगीत हे बसेल. पाण्याचा स्त्रोत कृष्णा नदी आहे.
- वीज: सरकारी वीज मंडळाकडून उपलब्ध व शिवाय स्वतःची निर्मिती.
- इंधन: कोळसा १७०० कि. प्रतितास व कॉन्सन्ट्रेटेड स्पेंट वॉश ६७१७ कि. प्रतितास , कारखान्याकडे स्वतःचा उपलब्ध व कोळसा पुरवठादार उपलब्ध
- कच्चा माल:

| माल | प्रमाण प्रतिदिन | तपशील |
|---|---|---|
| मळी टन | २२३ | स्वतःकडे व जिल्ह्यात उपलब्ध. |
| पोषके कि. | १६० | सांगली, कोल्हापूर याजवळच्या बाजारातून उपलब्ध. रस्त्याने वाहतूक |
| टर्की रेड ओईल कि. | १५० | |

## ४. प्रक्रियेचे वर्णन व प्रदूषणाचे उत्सर्जन

**<u>प्रक्रिया:</u>**

आसवनी प्रक्रियेचे मुख्यतः तीन टप्पे आहेत. १) मळीची पूर्वतयारी २) किण्वन-प्रक्रिया व ३) उर्ध्वपातन

**<u>वायू उत्सर्जन</u>**

| # | स्त्रोत | प्रदूषके | उपाय | नियंत्रण |
|---|---|---|---|---|
| १ | यार्ड | धूळ व हायड्रो कार्बन | समतल रस्ते व जमीन, रबरी धावा, हळू गती व त्वरित वापर | -- |
| २ | प्रस्तावित बॉयलर बंब | धूळ, कार्बन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड | नियमित देखभाल | पंखे, कार्बन ऑक्साइड दर्शक, ई. एस. पी. यंत्रणा व राख विसर्जनासाठी उंच धुराडे |
| ३ | किण्वन | कार्बन डायऑक्साइड | बंद टाकी | स्क्रबर |
| ४ | उर्ध्वपातन | कार्बनी संयुगे | बंद प्रक्रिया | |
| ५ | स्पेंट वॉश | उष्णता | हीट एक्स्चेंजर | |
| ३ | सांडपाणी | गंधक व कार्बनडाय ऑक्साइड | बंद वाहतूक | पूर्णतः प्राणवायूने शुद्धीकरण |

**<u>सांडपाणी</u>**

येथे तीन प्रकारचे उप प्रवाह आहेत.(१) शीतलक व बंब यातून आलेले सौम्य प्रकारचे पाणी, (२) प्रक्रिया, प्रयोगशाळा, जमीन स्वच्छता यातून आलेले प्रदूषित पाणी (३) स्पेंट वॉश .

**घनकचरा**

| # | प्रकार | प्रमाण | निःसारण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | वसाहत | १ घ. मी. | बगीच्यात खत रूपाने | मिश्र |
| २ | शुद्धीकरणातील गाळ | ४० कि. | जमिनीवर खत रूपाने | सेंद्रिय, घातक नाही |
| ३ | कचेरी | १ घ. मी. | विक्री | घातक नाही |
| ४ | राख | ६० टन | विक्री | घातक नाही |
| ५ | यीस्ट स्लज | ३० कि. | जमिनीवर खत रूपाने | सेंद्रिय, घातक नाही |

**घातक घनकचरा**

| वर्ग | प्रक्रियेतील पायरी | कचऱ्याचा भाग | | शेरा |
|---|---|---|---|---|
| ३८ | रसायनांच्या भांड्यांची स्वच्छता | ३८.१ | स्वच्छता करताना निघालेला गाळ | टीप क्र. १ |
| | | ३८.२ | शुद्धीकरणातील गाळ | |
| ४१ | शुद्धीकरण प्रक्रिया | ४१.४ | विलयकाचा उर्ध्वपातन टप्पा | टीप क्र. २ |
| ४४ | वंगणाचा वापर | 44.1 | वाया गेलेले तेल | टीप क्र. ३ |
| | | 44.2 | वाया गेलेले वंगण | |

टीप क्र. १: अशी पिंपे कमी आहेत व ती पुरवठादारांकडे परत पाठवता येतात.

टीप क्र. २: हा टप्पा येथे महत्त्वाचा ठरत नाही.

टीप क्र. ३: यांत्रिक उद्योग नसल्याने येथे तेल किंवा वंगण याचा उपयोग मर्यादित आहे. हे वंगण बैल गाड्यांना वापरता येते.

## ५. पर्यावरणीय आघात सीमित करण्यासाठी कार्यवाही

- हवा प्रदूषण: ई. एस. पी. नियंत्रण यंत्रणा, पंखे व योग्य उंचीचे धुराडे अशी योजना
- जल प्रदूषण: येथून शून्य जलप्रवाह बाहेर जावा अशी नियंत्रण व पुनर्वापर योजना. सौम्य व प्रदूषित दोन्ही उप प्रवाह एकत्र करून सी. पी. यू. द्वारे प्रक्रिया व पुनर्वापर. स्पेंट वॉश मधील पाण्याचे प्रमाण कमी करून इंधन म्हणून वापर.
- ध्वनी: यंत्रांना खंबीर पाया, कामगारांस वैयक्तिक सुरक्षा साधने, सर्वत्र झाडांचे पट्टे इ.
- घन कचरा: कमी प्रमाण, शक्यतो पुनर्वापर किंवा विक्री. राखेची विक्री. घातक घन कचर्याचे प्रमाण अत्यंत कमी. योग्य विल्हेवाट

**६. घातक प्रक्रियेबाबत सुरक्षा:**

अल्कोहोल निर्मिती व साठवणीच्या वेळी आगीची शक्यता असते. तथपि संभाव्य धोक्यांचा अभ्यास केला आहे. कामगारांस सुरक्षा व आणिबाणी हाताळणे याचे प्रशिक्षण दिले आहे.

**७. भांडवल गुंतवणूक:**

या प्रकल्पासाठी रु. ८० कोटी असे अंदाजपत्रक आहे. पर्यावरण रक्षणासाठी रु. ७.३ कोटींची तरतूद केली आहे.

सर्व परवानग्या मिळाल्यानंतर सुमारे १ वर्षात प्रकल्प कार्यान्वित करण्याचा मानस आहे.

**८. स्थान निश्चिती संबंधित माहिती**

सध्याच्या प्रकल्पाची जागा यास औद्योगिक परवाना आहे. संकल्पित प्रकल्प येथेच उभारण्यात येणार आहे. एकून जमीन ५०.५९ हे. कारखान्याकडेच आहे. नव्याने लागणार नाही. अभ्यास क्षेत्रात वन जमीन, संवेदनशील ठिकाणे किंवा मोठा उद्योग नाही. प्रकल्प राज्य महामार्गापासून जवळच आहे. १० कि. मी. परिसरात कृष्णा व येरळा या नद्या आहेत. प्रकल्पापासून १.७ कि. मी. अंतरावर यशवंतराव चव्हाण सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य आहे. योग्य ती काळजी घेतली आहे.

**९. पर्यावरणीय पार्श्वभूमी**

- नमुने गोळा करून पर्यावरणीय पार्श्वभूमीचा अभ्यास केला आहे. भूजल, भूपृष्ठजल, हवा यांचे गुणधर्म नियमानुसार आहेत. मृदा योग्य आहे.
- १० कि. मी. अभ्यास क्षेत्रात वनस्पती अगर प्राणी यांच्या नष्ट होण्यासारख्या प्रजाती नाहीत.
- या अभ्यास क्षेत्रातील जनता मुख्यतः शेतीवर अवलंबून आहे. त्यांची उन्नती साधण्यासाठी असे औद्योगिकीकरण उपयोगी पडेल.

**१०. धोकादायक परिस्थिती हाताळणी व सुरक्षा**

संभाव्य धोक्यांचा पूर्ण अभ्यास केला आहे. कामगारांस सुरक्षा व आणिबाणी हाताळणे याचे प्रशिक्षण दिले आहे. शासकीय कारखाना पर्यवेक्षक, म. प्र. नि. मंडळ अधिकारी व निष्णात विषयतज्ञ यांच्या सूचना विचारात घेतल्या आहेत.

## ११. पर्यावरणावर संभाव्य परिणाम

हवा, पाणी, जमीन, वनस्पती व प्राणी आणि आसमंतातील शेजारी यांचेवर म्हणण्यासारखा प्रभाव वा दुष्परिणाम होणार नाही. हवा प्रदूषके आटोक्यात आणण्यासाठे इ. एस. पी., पंखे व धुराडे यांची योजना आहे. शून्य सांडपाणी प्रणाली वापरल्याने भूजल अथवा भूपृष्ठ्जल प्रदूषित होणार नाही. संपूर्ण सांडपाणी शुद्धीकरण करून पुनर्वापरात घेण्यात येईल. वनस्पती अगर प्राणी यांच्या नष्ट होण्यासारख्या प्रजाती नाहीत. हवा प्रदूषणाची पातळी जोखण्यासाठी गणिताचा वापर केला आहे. होणारे प्रदूषण अत्यल्प असून ते शासकीय मर्यादेत आहे.

## १२. आणिबाणी व अपघात तयारी

आपत्कालीन प्रबंधक गट अस्तित्वात असून हा गट मनुष्यनिर्मित किंवा नैसर्गिक आपत्तीत कार्यवाही करेल. या गटातील सदस्य हे प्रशिक्षित असून त्यांना आणिबाणी रोखण्याचा अनुभव आहे. कामगारांस वैयक्तिक सुरक्षा साधने पुरविली आहेत, तसेच कारखान्य्यात जागोजागी ठेवली आहेत. काम करताना अपघात होऊच नयेत यासाठी कामगारांना प्रशिक्षण दिले आहे.

## १३. सामाजिक जबाबदारीचे भान

सरकारी नियमानुसार सामाजिक जबाबदारीची योजना आखली आहे. जाहीर सुनावणीत येणाऱ्या सूचनांचाही विचार करता येईल. त्यातील प्रमुख पैलू असे:

| क्र. | तपशील |
|---|---|
| १ | शिक्षण व वसतीगृहे |
| २ | शेतकरी बांधवांस प्रशिक्षण व कार्यशाळा |
| ३ | आरोग्य विषयक शिबिरे व सुविधा |
| ४ | वृक्ष संवर्धन व रोप्त्यांचा पुरवठा |
| ५ | महिला सक्षमीकरण |
| ६ | तरुणांस व्यवसाय प्रशिक्षण |
| ७ | खेडेगावांना सुविधा पुरवण्यासाठी मदत |
| ८ | प्रधानमंत्री/ मुख्यमंत्री यांच्या मदत निधी फंडास मदत |

सुधारित कंपनी कायदा १९५६, यातील सूचनांनुसार व सर्वांशी चर्चा करून अंतिम योजना करता येईल.

**१४. कर्मचारी आरोग्य व स्वास्थ्य यासंबंधी**

कारखाना कायदा व अधिनियम यांचे आधीन राहून ही योजना राबवता येईल. यानुसार तज्ञ डॉक्टरांकडून क्ष-किरण, दृष्टी, श्रवण इ. च्या परीक्षा घेऊन नोंद ठेवण्यात येईल.

**१५. प्रकल्प पूर्ततेनंतर परीक्षण**

| # | **पैलू** | **नमुन्याचे ठिकाण** | **गुण** | **वारंवारीता** |
|---|---|---|---|---|
| १ | भूपृष्ठ्जल | प्रवाहाचे वरील बाजूस एक, प्रवाहाचे खालील बाजूस एक व नाला | BOD, pH, SS, TDS, Colour | वर्षातून दोनदा |
| २ | भूजल | एक चढावर व दोन उतारावर | वरीलप्रमाणे | वर्षातून दोनदा |
| ३ | हवा | तीन दिशेस, हवेनुसार | RSPM, $SO_2$, NOx | वर्षातून दोनदा |
| ४ | ध्वनी | तीन दिशेस, म. प्र. नि. मंडळाच्या मान्यतेनुसार | डेसीबल | दिवस व रात्र |

नियमित परीक्षण करून याचा अहवाल शासनास पाठवण्यात येईल.

- o -

याप्रमाणे पूर्ण जबाबदारीने पर्यावरण संरक्षण व चिरंतन विकास करण्याचा संचालक मंडळाचा निर्धार आहे.